2-Info-Kit-Global-Perspective-Marathi_Print.pdf 1 04-07-2014 PM 12:07:54

# जागतिक दृष्टीकोन

## असुरक्षित गर्भपाताशी संबंधित मृत्यू प्रति १,००,००० जिवंत जन्मांमागे, २२८




## असुरक्षित गर्भपात: भारतातील ८ टक्के मातामृत्यू

- जगभरात मातामृत्यूच्या प्रमुख कारणांपैकी असुरक्षित गर्भपात हे पहिल्या तीन कारणांमध्ये आहे.
- जगभरातील अंदाजित २१.६ दशलक्ष स्त्रिया दरवर्षी असुरक्षित गर्भपात करून घेतात.
- जगभरात ४७ हजार स्त्रिया असुरक्षित गर्भपाताने मरण पावतात. सुमारे ५ दशलक्ष स्त्रियांना गर्भपाताशी संबंधित गुंतागुंतीमुळे अपंगत्व ओढवते.
- जवळपास सर्व असुरक्षित गर्भपात विकसनशील देशांमध्ये होतात.
- आशियामध्ये सुमारे १७००० स्त्रिया दरवर्षी असुरक्षित गर्भपाताने मरण पावतात.
- भारतात असुरक्षित गर्भपात हे एकूण मातामृत्यूपैकी ८ टक्क्यांचे कारण आहे. याचाच अर्थ असा की प्रत्येक दोन तासांना एक स्त्री गर्भपाताशी संबंधित कारणामुळे मृत्यू पावते.

### विकसनशील देशांमधील गर्भपाताच्या कायद्यांमधील सुधारणांमुळे गर्भपाताशी संबंधित मृत्यू आणि विकृतींच्या प्रमाणात घट झाली आहे.

- दक्षिण आफ्रिका: १९९७ साली कायद्यात सुधारणा करून आणल्यानंतर गर्भपाताशी संबंधित मृत्यूंमध्ये वार्षिक ९१ टक्के घट झाली.
- नेपाळ: आठ जिल्ह्यांमधील सुविधांचा अभ्यास केल्यावर मातांचे आजार ४८ टक्के कमी झाल्याचे आणि गर्भपाताशी संबंधित गुंतागुंतीचे प्रमाण कमी झाल्याचे दिसले.
- इथिओपिया: प्रति १००,००० जिवंत जन्मांमागे गर्भपाताच्या गुंतागुंती (एका मोठ्या रूग्णालयात) सुमारे ७० टक्क्यांनी कमी झाले.

परंतु भारतात सुमारे ४० वर्षे गर्भपात कायदेशीर असूनही जवळपास ४० टक्के गर्भपात सुरक्षित असल्याचे मानले जाते.

स्रोत: गुटमाकर इन्स्टिट्यूट/वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन-2012